Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

**Peer-Reviewed Indexed**

**Multidisciplinary International Research Journal**

November -2020

SPECIAL ISSUE NO - CCLX (260)

## INDIAN WOMEN : PRESENT, PAST AND FUTURE



**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Executive Editor:**
Dr.R.M.Hajari
Principal
Sham Gadale Art's Collage,
Dahiphal (Wadmauli)
Tq.KAJJ,.Dist. BEED.

**Editor:**
Dr.S.N.Jadhavar
Head, Deptt. of History,
Sham Gadale Art's Collage,
Dahiphal (Wadmauli)
Tq.KAJJ,.Dist. BEED.

### The Journal is indexed in:

Scientific Journal Impact Factor (SJIF)

Cosmos Impact Factor (CIF)

International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : *www.aadharsocial.com*

Aadhar Publications

Impact Factor - 7.675 ISSN - 2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed Indexed

***Multidisciplinary International Research Journal***

**November - 2020**

ISSUE No - CCXLIV (260)

# INDIAN WOMEN : PRESENT, PAST AND FUTURE

Prof. Virag.S.Gawande
Chief Editor :
Director
Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.

Dr.S.N.Jadhavar
Editor :
Head, Deptt. of History,
ham Gadale Art's Collage, Dahiphal (Wadmauli) Tq.KAJJ,.Dist. BEED.

Dr.R.M.Hajari
Executive Editor:
Principal
Sham Gadale Art's Collage, Dahiphal (Wadmauli) Tq.KAJJ,.Dist. BEED.

**Aadhar International Publications**

For Details Visit To : www.aadharsocial.com

© All rights reserved with the authors & publisher

| | | |
|---|---|---|
| 22 | Gender Justice And Workplace Security **Pininti Surekha / Ch.V.Lalitha Kumari** | 79 |
| 23 | Is Bollywood Giving a Blow to Gender Stereotypes? : A Study of Bollywood Movies of 2000s **Prof. Prajakta S. Raut** | 83 |
| 24 | Health Right of Indian Women **Dr. Ragini Rajendra Padhye** | 89 |
| 25 | The new Indian Middle Class Woman: A talent of new era **Rajesh Kumar Sinha** | 91 |
| 26 | Women's Education In India **Ravikumar M** | 95 |
| 27 | Objectification Of Women In Rain Dance Of Indian Bollywood Movies **Rizwana Khatoon** | 100 |
| 28 | Theorising Women; Manu's Perspective **Dr.Sahana Priyadarshini** | 104 |
| 29 | Women Appeared in the Satavahana Cave Inscriptions of Pune District. **Samir Mankar,** | 107 |
| 30 | Empowerment of women in india "a historical approach" **Prof. Dr. Shahinjahan a malek** | 113 |
| 31 | Gandhari; In Search Of Light **Shruthi T** | 116 |
| 32 | Contribution of Women in Freedom Movement in India **Prof. Somanakatti Bhimavati,** | 119 |
| 33 | Maryam Jameelah : A Prolific Writer of Islam **Syed BushraNahid Rahim** | 121 |
| 31 | The glamorous image of Zeenat Aman reflected in DevAnand's autobiography Romancing with Life. **Dr. Syed Nisar Karim** | 123 |
| 35 | "A Political Participation of Women In Panchayat Raj In Maharashtra" **Talnikar S.G.** | 125 |
| 36 | Women Entrepreneurs : Challenges **Dr.Ambadas Pandurang Barve** | 129 |
| 37 | एकविसाव्या शतकाचा वेध घेणारा शास्त्रज्ञ : महर्षि कणाद श्री. अजितकुमार भिमराव पाटील | 133 |
| 38 | स्वातंत्र्य चळवळीतील स्त्रियांचे योगदान. **अक्षय कमलाकर पवार / डॉ.कविता एस. बियाणी** | 138 |
| 39 | भारत सरकारने महिला सशक्तीकरणासाठी राबवलेल्या काही प्रमुख योजना प्रा. अमरदीप गुरमे | 142 |
| 40 | महिला सबलीकरण : काळाची गरज प्रा.डॉ.अंबादास पांडुरंग बर्वे | 149 |
| 41 | जयपुर–अतरौली घराने की प्रसिद्ध गायिका अश्विनी भिडे–देशपांडे AMOL WASUDEORAO GAWANDE | 156 |
| 42 | भारतीय संगीतात महिलांचे स्थान डॉ.अनया थत्ते | 162 |
| 43 | १९ व्या शतकातील स्त्री : कार्य कर्तृत्व एक अवलोकन **प्राचार्य डॉ. बबन पवार** | 167 |
| 44 | भारतीय महिला धावपट प्रा. डॉ. भास्कर माने | 169 |
| 45 | स्वातंत्र्य सेनानी खान्देश कन्या रणरागिनी लीलाताई पाटील प्रा. जया यशवंत बाविस्कर | 172 |
| 46 | वृद्धांच्या समस्यांचा समाजशास्त्रीय अभ्यास **डॉ.सुनंदा विश्वनाथ भद्रशेटे** | 175 |

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) –7.675, Issue NO, 265 (CCXLIII)
ISSN : 2278-9308
November, 2020

# स्वातंत्र्य चळवळीतील स्त्रियांचे योगदान.

**अक्षय कमलाकर पवार**
सहाय्यक प्राध्यापक
दयानंद वाणिज्य महाविद्यालय, लातूर.

**डॉ.कविता एस. बियाणी**
संशोधन विभाग प्रमुख
दयानंद वाणिज्य
महाविद्यालय, लातूर.

**सार :-**

एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी स्त्रियांची स्थिती अत्यंत दयनीय होती. यातच बाल वयात मुलींचे विवाह, त्यांची शारीरिक व मानसिक वाढ होण्याआधीच त्यांना संसाराच्या ओझ्याखाली दडपायचे अशातच अनेक लहान मुलींचे लग्ने प्रौढ पुरुषांशी केल्याने कित्येक मुलींना बाल वयातच वैधव्य प्राप्त होत असे. विधवांना कुटुंबापासून वेगळे जगावे लागत असे. केशवपन करण्याचीं प्रथा, सतीची प्रथा (पतीच्या मृत्युनंतर पत्नीचे सती जाणे) यांसारख्या क्रुर प्रथा त्यावेळी अस्तित्वात होत्या. एकुणचं काय तर स्त्रियांना स्वतंत्र अस्तित्व नव्हते. मात्र अशा परिस्थितीत आपल्या कार्याचा ठसा उमटविण्याची जिद्द कायम घेवून उपेक्षित समाजासाठी काहीतरी करण्याची उमेद घेवून अनेक महिलांनी उल्लेखनिय कार्य केले आणि या कार्यासाठी तत्कालीन पुरुष समाजसुधारकांनी त्यांना मोलाची साथ दिली. काही समाजसुधारकांनी स्त्रि विषयक सुधारणा या विषयावर भर देवून स्त्रियांची स्थिती सुधारण्याचा प्रयत्न केला. आज आपण स्वातंत्र्याची जवळपास जवळपास ७० वर्षे पार पाडली. या प्रवासात स्त्रियांचे योगदान आपणास प्रेरणादायी ठरते. एकंदरीतच काय तर स्त्रियांची स्वातंत्र्य चळवळीतील मोलाची कामगिरी आपण या लेखात पाहणार आहोत.

**कळ शब्द :-** स्वातंत्र्य चळवळ, उठाव, सत्याग्रह, कट, महिलांचे योगदान.

**प्रस्तावना :-**

आधुनिक भारताच्या इतिहासात अनेक क्रांतीकारक घटना, सत्याग्रह, कट, हल्ले यांना एक विशेष महत्व प्राप्त आहे. भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्याच्या उद्देशाने प्रेरित झालेल्या भारतीय जनतेने **"करा किंवा मरा"**, या प्रेरणेने आंदोलने, सत्याग्रह गतीमान केले. या अशा सर्वव्यापी लढयात स्त्रियांची भूमिका कायम महत्वपुर्ण राहिली. या अशा चळवळीतून भारतीय स्वातंत्र्याच्या प्रक्रियेला गती मिळाली. भारताला स्वातंत्र्य मिळाले ते केवळ पुरुषांच्या कामगिरीवर असे जर आपणास वाटत असेल तर कदाचित हा लेख आपणास भारतीय स्वातंत्र्य चळवळीत असणाऱ्या महिलांच्या योगदानाबद्दल माहिती आकलन करण्यास मदत करेल. स्वातंत्र्य चळवळीच्या पर्वात जेवढे महत्व पुरुषांना द्यावे तेवढयाच प्रमाणात आपणाला स्त्रियांनाही द्यावे लागेल. भारतीय स्वातंत्र्य लढयात स्त्रियांनीही मोठया प्रमाणात सहभागी घेतला हे आपण इतिहासात पाहिलेच आहे. भारतीय महिला या फक्त स्वातंत्र्य चळवळीतच अग्रेसर होत्या असे नव्हे. तर आजतागायत त्या वेगवेगळया क्षेत्रात आपल्या कामाची छबी चित्रीत करत आहेत.

**अभ्यासाची उद्दिष्टे :-**

१) भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील महिलांच्या योगदानाची माहिती संकलीत करणे.
२) भारतीय स्वातंत्र्य चळवळीत सहभागी असणाऱ्या महिलांचा अभ्यास करणे.
३) भारतीय स्वातंत्र्य चळवळीवर माहिती संघटित करणे.

**संशोधन पध्दती :-**

सदर संशोधन हे संशोधन पध्दतीच्या दुय्यम संसाधनाच्या आधारे करण्यात आलेले आहे. यात प्रामुख्याने शालेय पाठयपुस्तके, वर्तमानपत्रे, संदर्भग्रंथ, ऑनलाईन वेबसाईट यांचा समावेश आहे.

**संशोधनाचा मुख्य भाग :-**

भारतीय स्वातंत्र्याची पायाभरणी १८५७ च्या उठावापासुन झाली. या उठावामध्ये सुध्दा महिलांचा सहभाग अग्रेसर होता. १८५७ च्या उठावात जेवढा भाग महिलांनी घेतला त्याची संख्या जरी कमी दिसत असली तरी त्यांनी दिलेला लढा अतिशय महत्वाचा आहे. १८५७ चा उठाव भारतात विविध प्रांतात केला गेला. त्यात कानपुर, लखनो, दिल्ली,

ISSN : 2278-9308
November, 2020

जगदिशपुर तसेच झांशी या प्रांतांचा समावेश होता आणि उल्लेखनिय बाब म्हणजे झाशीच्या उठावाचे नेतृत्व हे एका महिलेने केले त्या म्हणजे **राणी लक्ष्मीबाई** होत.

झाशीची राणी लक्ष्मीबाई यांनी सुध्दा झाशीच्या स्वातंत्र्यासाठी इंग्रजांविरुध्द रणशिंग फुंकले होते. १० मे १८५७ रोजी मीरत सैनिकांनी केलेल्या उठावाने १८५७ चा उठावाची सुरुवात झाली. भारतात विविध प्रांतात उठावाचे लोण पसरु लागले होते. दिल्लीवर राज्य मिळविले तर संपुर्ण देशावर राज्य मिळण्यास सहकार्य होईल या दृष्टीकोनातून सर्व क्रांतीकारक दिल्लीच्या दिशेने जाण्याचा कसोशीने प्रयत्न करत होते. १८५७ च्या प्रारंभीस झाशीच्या सैनिकांनी उठाव सुरु केला होता. राणी लक्ष्मीबाई यांना झाशीची शासिका म्हणून घोषित करण्यात आले. कानपूरहून आलेले तात्या टोपे यांची मदत घेवून झाशीच्या राणी लक्ष्मीबाई यांनी १८५७ च्या उठावात आपली भूमिका अजरामर ठेवली.

३ एप्रिल १८५७ रोजी सर हयु रोझ या इंग्रज अधिकाऱ्याने झाशीवर आक्रमण करुन झाशी पुन्हा इंग्रजांच्या ताब्यात घेतली. मात्र तरीही राणी लक्ष्मीबाई आपल्या सहकार्यांच्या मदतीने आगेकुच करत होत्या. यातच इंग्रजांविरुध्द लढा देत असताना १७ जून १८५८ रोजी जनरल हयु रोझ या अधिकाऱ्याने केलेल्या हल्यात झाशीच्या राणीला विरगती प्राप्त झाली. एका महिलेने दिलेला हा स्वातंत्र्य लढा इतिहासात सुवर्ण अक्षरात नोंदविला गेला. आजही आपण १८५७ चा उठाव हे शब्द कानावर ऐकले तर नकळतच आपल्याला राणी लक्ष्मीबाई यांच्या कार्याची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. यासोबत अयोध्येची बेगम हजरत महल यांनी सुध्दा आयोध्याचे १८५७ च्या उठावात केलेले नेतृत्व लक्षणीय आहे.

**चितगाव शस्त्रागारावरील हल्ला :**

स्वातंत्र्य चळवळीतील अनेक सत्याग्रह, उठाव, हल्ले झाले आणि यात स्त्रियांचे योगदान उल्लेखनिय आहेच असाच एक कट होता तो चितगाव कट. यातील महिलांच्या सहभागामुळे या कटाला विशेष महत्व प्राप्त झाले आहे. कल्पना दत्त, प्रितीलता वड्डेदार या महिलांनी आपले सहकारी सुर्यसेन, अनंत सिंग, गणेश घोस यांच्या सोबत या कटात सहभाग घेतला. सुर्यसेन या गटाचे प्रमुख होते. १८ एप्रिल १९३० या दिवशी वरील क्रांतीकारकांनी चितगाव मधील २ शस्त्रगारातील शस्त्रे आपल्या ताब्यात घेतली. संदेशवहनाच्या सर्व यंत्रणा ठप्प केल्या. चितगाव मधील ब्रिटीश फौजेच्या सुर्यसेन आणि त्यांच्या निष्ठावंत क्रांतीकारक सहकाऱ्यांनी पुर्णपणे लढा दिला. मात्र प्रतिकार करणे शक्य नाही हे माहित झाल्यास त्यांनी चितगाव जवळील डोंगराचा आश्रय घेतला. १६ फेब्रुवारी १९३३ रोजी सुर्यसेन आणि सर्व सहकारी इंग्रजांनी ताब्यात घेतले आणि सुर्यसेन व त्यांच्या १२ सहकार्यांना फाशी देण्यात आली. **कल्पना दत्त** यांना जन्मठेप सुनावण्यात आली व **प्रितीलता वड्डेदार** यांनी पोलीसांच्या हाती न लागता आत्महुती दिली. याच कटात **शांती घोष, सुनिती चौधरी** या शाळकरी मुलींनी सुध्दा सहभाग घेतला आणि आपल्या स्वातंत्र्यासाठी उल्लेखनिय कामगिरी बजावली. या दोघांनी मिळून जिल्हा न्यायाधिशाला ठार केले. तर **विना दास** या युवतीने कलकत्ता विद्यापीठात पदवीदान समारंभात तेथील गव्हर्नरवर गोळया झाडून त्याची हत्या केली. अशा अनेक क्रांतीकारी घटना स्वातंत्र्यपुर्व काळात घडल्या आणि यात महिलांचा सहभाग अतिशय मोलाचा ठरला.

भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील चळवळीत एकूणच क्रांतीकारी घटना, सत्याग्रह, उठाव यांना महत्वाचे स्थान आहे आणि यात असलेल्या महिलांच्या योगदानाला सुध्दा तितकेच महत्व आहे.

**सविनय कायदेभंग चळवळ :**

सविनय सत्याग्रह संग्रामामध्ये स्त्रिया अग्रेसर असल्याचे दिसून येते. दारुच्या व परदेशी मालांच्या दुकानासमोर निदर्शने करणे, इंग्रजांविरुध्द काम करणे. इंग्रज अधिकाऱ्यांच्या विरोधात या सर्व स्त्रिया एका धैर्याने पुढे जात होत्या. सविनय कायदे भंगातील स्त्रियांची कामगिरी उल्लेखनिय बाब आहे. काही महिलांनी तर यात तुरुंगवास सुध्दा पत्कारला होता.

**कस्तुरबा गांधी, कमलादेवी चट्टोपाध्याय, अवंतिकाबाई गोखले, लिलावती मुंशी, हंसाबेन मेहता** अशा अनेक स्त्रियांनी या सविनय सत्याग्रहात आपला पुढकार घेतला आणि भारतीय स्वातंत्र्य चळवळीत आपली मोलाची कामगिरी बजावली. सत्याग्रहासाठी लागणारी जिद्द आणि सहनशक्ती स्त्रियांनी दाखवून दिली.

**धारासना सत्याग्रह :**

सविनय कायदेभंगाची चळवळ सुरु करण्याचा ठराव लाहोर अधिवेशनात ठरविण्यांत आला आणि सर्व सुत्रे महात्मा गांधीकडे देण्यात आली. मिठाचा सत्याग्रह हा एक प्रतिकात्मक सत्याग्रह होता. मिठावरील कर व मिठ तयार करण्याची सरकारची मक्तेदारी रद्द करावी अशी याची प्रमुख मागणी होती. अशातच महात्मा गांधीजींना अटक झाली

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ((SJIF) -7.675, Issue NO, 265 (CCXLIII)
ISSN : 2278-9308
November, 2020

म्हणून गुजरात मधील धारासना येथील सत्याग्रहाचे नेतृत्व एका महिलेला देण्यात आले त्या **सरोजनी नायडू** होत. सरोजनींच्या नेतृत्वाखाली तेथील दोन हजार सत्याग्रहिंनी मोठया धैर्याने सत्याग्रह केला. यात मिठाचा कायदा मोडण्यासाठी सत्याग्रहिंच्या वेगवेगळया तुकडया करण्यात आल्या होत्या. एक तुकडी निघाल्यावर पोलीस अधिकारी त्या तुकडीवर लाठयांचा प्रहार करत असत. यामुळे सत्याग्रही रक्तबंबाळ होवून जमिनीवर कोसळत आणि त्यांना शुश्रुषेसाठी घेवून गेल्यानंतर दुसरी तुकडी पुढे सरकावत असे. असे या धारासना सत्याग्रहाचे वर्णन होते. वेब मिलर या अमेरिकन पत्रकाराने या घटनेचे अत्यंत ऱ्हदयकारक वर्णन केलेले आहे यातूनच आपणास सरोजनी नायडू यांचे मोलाचे योगदान दिसून येते. आपले नेतृत्व महात्मा गांधी अटक आहेत या नंतर सत्याग्रह पुढे चालवायचा असेल तर आपणच पुढे सरसावले पाहिजे ही मुख्य भूमिका या ठिकाणी सरोजनी नायडू यांच्याकडून स्पष्ट होते.

गांधीजींचे सुध्दा हेच मत होते की, सत्याग्रहासाठी लागणारे मनोधैर्य पुरुषांपेक्षा स्त्रियांकडे अधिक असते. गांधीजींच्या याच प्रेरणेमुळे पुढील काळात राष्ट्रीय चळवळीत स्त्रियांच्या सहभागाचे प्रमाण वाढत गेले. अशा सत्याग्रहातूनच स्त्रियांचे मनोबल वाढत गेले.

**मादाम कामा :-**

भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीत परदेशातील भारतीय क्रांतीकारकाकडून सुध्दा सहाय्य मिळत होते. यातच लंडन येथे स्थित असलेले इंडिया हाऊस याचे उत्तम उदाहरण आहे. लंडन हाऊस अशा परकीय साहाय्याचे केंद्र बनले होते. रशियन क्रांतिकारकांच्या दहशतवादी पदतीचा वापर करुन ब्रिटीशांना वटणीवर आणले पाहिजे असे इंडिया हाऊसचे प्रमुख श्यामजी कृष्ण वर्मा यांचे मत होते. त्यांच्याच या गटात मादाम कामा या सुध्दा सामिल होत्या. मादाम कामा एक समाजवादी क्रांतीकारक होत. त्यांनी प्रथमतः जर्मनीत स्टुटगार्ट येथे भरलेल्या जागतिक समाजवादी परिषदेत भारतीय स्वातंत्र्याबद्दल आस्था उपस्थित केली आणि प्रश्न विचारले. याच समाजवादी परिषदेत मादाम कामा यांनी भारतीय ध्वज सुध्दा फडकविला. मादाम कामाचे सुध्दा भारतीय स्वातंत्र्य चळवळीत दिलेले योगदान पुढील वाटचालीस प्रेरक ठरले.

**डॉ.अँनी बेझंट :-**

१९१४ साली पहिले महायुध्द सुरु झाले. देशासाठी काही मिळवता येईल या भावनेतून राष्ट्रीय काँग्रेसने इंग्रजांना युध्दात मदतीचे आश्वासन दिले. पण जहालांचे मत हे होते की, यामुळे काहीही फायदा होणार नाही. याचवेळी १९१५ मध्ये डॉ.अँनी बेझंट यांनी आर्यलँडच्या होमरुळ लिगप्रमाणे भारतात मद्रास प्रांतात होमरुळ लिगची म्हणजेच स्वराज्य संघाची स्थापना केली. या स्वराज्याच्या ठरावाला लोकमान्य टिळकांची साथ मिळाली. डॉ.अँनी बेझंट यांना भारतीय संस्कृतीबद्दल असलेला आदर यातुन स्पष्ट होतो. स्वराज्याच्या मागणीसाठी वर्षभर चळवळ चालु ठेवणे ही या स्वराज्य संघाची प्रमुख मागणी होती. सरकारवर दबाव आणून स्वशासन चालवायचे ही प्रमुख भुमिका घेऊन डॉ.अँनी बेझंट यांच्या स्वराज्य संघाच्या धर्तीवर लोकमान्य टिळकांनी महाराष्ट्रात पुणे येथे होमरुळ लिगची स्थापना केली. स्वराज्य संघामार्फत स्वराज्यासाठी लोकमत जागृत व संघटीत करण्यासाठी डॉ.अँनी बेझंट व त्यांच्या सहकार्यांनी देशभर दौरे केले. याचाच परिणाम अमेरिकेत असलेल्या लाला लजपतराय या जहाल नेत्यांवर झाला आणि त्यांनी अमेरिकेत होमरुळ लिगच्या कार्याचा प्रचार केला. १९१४ सालापासून इंग्लंड पहिल्या महायुध्दात गुंतले असल्याने होमरुळ लिग चळवळीने स्वातंत्र्याचा जोर धरला आणि ब्रिटीश सरकार अडचणी आले त्यामुळे ब्रिटीश सरकारने दंडपशाहीचा अवलंब केला. लोकमान्य टिळकांवर राजद्रोहाचा खटला भरला परंतु ते निर्दोष सुटले. परंतु डॉ.अँनी बेझंट यांना मात्र शिक्षा भोगावी लागली. एका महिलेने दिलेले हे भारतीय चळवळीतील योगदान पुढील स्वातंत्र्याच्या वाटचालीस प्रेरणादायी ठरले.

**अरुणा असफ अली :-**

भारतीय स्वातंत्र्य चळवळीत **"१८५७ चा उठाव"** हा पाया समजला जातो तर ९ ऑगस्ट १९४२ रोजी झालेली **"ऑगस्ट क्रांती"** हा स्वातंत्र्याचा कळस समजला जातो. १९४२ साली झालेल्या स्वातंत्र्य चळवळीतील **"ग्रँड ओल्ड लेडी"** आणि **"ऑगस्ट क्रांतीची नायिका"** म्हणून अरुणा असफअली यांना ओळखले जाते. १९४२ सालच्या क्रांतीमध्ये गँवालिया टँक मैदानावर भारतीय ध्वज उडविण्यासाठी प्रख्यात म्हणून त्यांना ओळखले जाते.

**निष्कर्ष :-**

भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील महिलांच्या योगदानाला एक महत्वपुर्ण स्थान प्राप्त आहे. कारण या महिलांनी कुठल्याही गोष्टीचा सारासार विचार न करता आंदोलन असेल वा सत्याग्रह असो, वा कट असो किंवा इतर कुठलीही गोष्ट

ISSN : 2278-9308
November, 2020

कसलीही पार्श्वभूमी न पाहता फक्त आणि फक्त इंग्रजांपासून स्वातंत्र्य मिळविणे या एकाच उद्देशाने केलेले कार्य आपणास त्यांच्या कार्याची पोचपावती देते. वर्षानुवर्षे घराच्या चौकटीत अडकून असलेल्या महिलांनी परंपरागत चौकट ओलांडून पुरुषांच्या खांदयाला खांदा लावून ब्रिटीशांविरुध्द लढा दिला. सुशिक्षित, अशिक्षित, गर्भ-श्रीमंत-दरिद्री, विभिन्न धर्म-जातीच्या लक्षावधी महिलांनी भारतीय स्वातंत्र्य संग्रामात आपली भूमिका अग्रेसर ठेवली. इंग्राजांविरुध्द अनेक महिलांनी आपली निडर भूमिका स्वातंत्र्य चळवळीत पणाला लावली. अनेक महिलांनी यात तुरुंगवास भोगला तर काहींना बलिदान द्यावे लागले. १८५७ चा उठाव ते भारत छोडो आंदोलनांपर्यंत महिलांनी दिलेल्या योगदानामुळे आपणास स्वातंत्र्य मिळू शकले हेही तेवढेच सत्य आहे.

**उषा मेहता, अरुणा असफअली, सुचेता कृपलानी, कमला नेहरु, विजयालक्ष्मी पंडीत** अशा अनेक महिलांनी भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीत दिलेल्या योगदानामुळेच आपण आज जवळपास स्वातंत्र्याची ७० वर्षे पार पाडली आहेत. कस्तुरबा गांधी यांनी आपल्या पतीची साथ कधीच सोडली नाही. उलटपक्षी त्यांनी सुध्दा इंग्रजांविरुध्द संघर्ष करण्याचा निर्धार केला होता. पडद्याआड अशी भूमिका **कस्तुरबा गांधींची** असली तरी एक महिला म्हणून स्वातंत्र्य चळवळीत दिलेले योगदान महत्वाचे ठरते. अशा अनेक महिलांच्या कार्याची माहिती घेतल्यास आपणास जाणवेल की, खरच या महिलांनी दिलेल्या योगदानाचे भारतीय स्वातंत्र्यात किती मोलाचे स्थान आहे.

भारतीय स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झालेल्या महिलांनी तुरुंगाची सुध्दा पर्वा केली नाही वा मृत्युची पर्वा केली नाही. अनेक पुरुष तुरुंगात असताना महिलांनी त्यांच्या घराची जबाबदारी सांभाळली. या सर्वच गोष्टी आपणास महिलांचे विशेष कार्य दाखवून देतात. अशा अनेक महिलांची म्हणावी तेवढी माहिती आपणास इतिहासात सापडत नाही, याची खंत पाहायला मिळते. इतिहासाला अज्ञात असलेल्या मुलांच्या कामगिरीवर संशोधन करुन प्रत्यक्ष महिलांचे कार्य प्रकाशात आणणे हे भावी संशोधकासमोर महत्वाचे काम आहे. सदर संशोधन त्या दृष्टीने महत्वाची दिशा देणारे ठरेल.

**संदर्भ सुची :-**

१) आधुनिक भारताचा इतिहास (आधुनिक काळ) - इयत्ता आठवी
२) महाराष्ट्राचा समग्र इतिहास - डॉ.अनिल कठारे, कल्पना प्रकाशन, नांदेड
३) आधुनिक भारताचा इतिहास - डॉ.एल.बी. ग्रोवर, एस. चंद आणि कंपनी प्रा.लि.
४) आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास - डॉ.एस.एस.गाठाळ, कैलाश पब्लिकेशन, औरंगपुरा, औरंगाबाद
५) https://www.loksatta.com